सकाळ TODAY
कोल्हापूर, गुरुवार, १५ जानेवारी २०२६

# डॉ. दीपक तुपे यांचा अनुवाद पुरस्काराने सन्मान



डॉ. दीपक तुपे

**कोल्हापूर :** महाराष्ट्र हिंदी परिषदेतर्फे विवेकानंद कॉलेजचे हिंदी विभागाचे सहायक प्राध्यापक डॉ. दीपक तुपे यांना डॉ. देविदास बामणे 'संघर्ष' अनुवाद पुरस्काराने गौरविले. विवेकानंद कॉलेज आणि महाराष्ट्र हिंदी परिषदेने घेतलेल्या राष्ट्रीय चर्चासत्रात ज्येष्ठ इतिहासतज्ज्ञ डॉ. वसंत मोरे यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान केला. रोख रक्कम, सन्मानपत्र, सन्मानचिन्ह, शाल-श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. डॉ. एस. वाय. होनगेकर लिखित 'आज गगन ठेंगणे' या मराठी आत्मकथेचा डॉ. तुपे यांनी 'आज आसमान बौना' या नावाने हिंदी अनुवाद केला आहे. या पुस्तकासाठी पुरस्कार मिळाला आहे. यावेळी डॉ. इरेश स्वामी, अनिल काळे, गजानन चव्हाण, चंद्रदेव कवडे, संजय थोरात, पांडुरंग पाटील, गजानन चव्हाण, माधवी जाधव, श्रुती जोशी, पंढरीनाथ पाटील, देविदास बामणे, नाजिम शेख, भाऊसाहेब नवले, सुरेश शेळके, विठ्ठलसिंह ढाकरे उपस्थित होते. डॉ. तुपे यांना पदवी-पदव्युत्तर अध्यापनाचा १५ वर्षांचा अनुभव आहे. त्यांनी यूजीसीच्या तीन बृहत शोधप्रकल्पावर परियोजना सहायक म्हणून काम केले आहे.

16.1.26